# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती सभा**

**कार्यपत्रिका क्र.३५, दि.१९/११/२०१५**

**सभा क्र.४८,दि.१९/११/२०१५ चा वृत्तांत**

नगरसचिव
विषय क्र. १५६३ ते १५९३
दा. वि.क्र. १५९४ ते १६२८
ठराव क्र. १५६३ ते १६२८

स्थायी समितीची साप्ताहिक सभा गुरूवार, दिनांक १९/११/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

३. मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत
४. मा.सौ.ओरसे शारदा शंकर
५. मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम
६. मा.ॲड.कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम
७. मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते
८. मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद
९. मा.जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत
१०. मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश
११. मा.तुपेरे राहूल बापू
१२. मा.बागवे अविनाश रमेश
१३. मा.सौ.बाबर आरती साईनाथ
१४. मा. राणे अनिल बाबूराव
१५. मा.सौ.लोणकर नंदा नारायण
१६. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. | मा. | मा. | मा. |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :–

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
३. मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.)
४. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
५. मा.अभिषेक कृष्णा,अध्यक्ष तथा संचालक,पीएमपीएमएल
६. श्री.सुनिल पारखी, नगरसचिव
७. मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.)
८. मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक)
९. मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख)
१०. मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष)
११. मा.मोरे दगा पितांबर, उपायुक्त (ग.व.नि.)
१२. मा.प्रकाश बोरसे, उपायुक्त (जिं.घ.)
१३. मा.मंगेश जोशी, उपायुक्त (जनरल)(सेवकवर्ग)
१४. मा.विजय दहीभाते, उपायुक्त (तांत्रिक)
१५. मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख
१६. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७. मा. विलास कानडे, उपायुक्त स्थानिक संस्था कर
१८. मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता
१९. मा.विवेक खरवडकर, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ )
२०. मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि.
२१. मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
२२. मा.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी
२३. मा.माधव जगताप, उपायुक्त अतिक्रमण प्रमुख
२४. मा.घोरपडे, सहा.उद्यान अधिक्षक
२५. मा. , उपायुक्त (समाजकल्याण)
२६. मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२)
२७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
२८. मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
२९. मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१)
३०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२)
३१. मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३)
३२. मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.४)
३३. मा.किशोरी गद्रे, उपायुक्त (वि.का. घनकचरा व्यवस्थापन)
३४. मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.)
३५. मा.राजेंद्र राऊत कार्य.अभियंता (पथ)
३६. मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता (विद्युत)
३७. मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत)
३८. मा.ना.न.बारापात्रे, विकास अभियंता, (पथ)
३९. मा.संदीप खांडवे, कार्यकारी अभियंता(भवन)
४०. मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प)
४१. मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता
४२. मा.अब्बास पटेल, अधीक्षक अभियंता
४३. मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी
४४. मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक)
४५. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
४६. मा.उमेश माळी
४७. मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख
४८. मा.सुभाष पुरी, पं.नेहरू स्टेडियम व्यवस्थापक
४९. मा.श्री.भोसेकर प्र.उपायुक्त मुख्य सुरक्षाअधिकारी
५०. मा.धारूरकर, (पी.एम.पी.एम.एल.)

प्रथम सभा क्र. ४१,दि.६/१०/१५ , सभा क्र.६६, दि.३०/१/१५, सभा क्र.७६, दि.५/३/२०१५ चे वृत्तांत कायम करावेत असे सर्वानुमते ठरले व त्यानंतर मा.अध्यक्ष यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या.

# पुणे महानगरपालिका
## स्थायी समिती सभा
## कार्यपत्रिका क्र.३५, दि.१९/११/२०१५
## सभा क्र.४८,दि.१९/११/२०१५ चा वृत्तांत

मा.अध्यक्षा–प्रथम श्रध्दाजंली वाहू या.

जेष्ठ व्यंगचित्रकार, आर.के.लक्ष्मण यांच्या पत्नी, लेखिका कमला लक्ष्मण, पॅरिसवर झालेल्या दहशतवादी हल्यात १२९ नागरीक मृत्यूमुखी पडले, कॉग्रेसचे जेष्ठ नेते व विधानसभेचे माजी अध्यक्ष, प्रमोद शेंडे, दैना बँकेचे माजी अध्यक्ष व सारस्वत बँकेचे जेष्ठ संचालक, अनिल जोशी , विश्वहिंदू परिषदेचे जेष्ठ नेते अशोक सिंघल, जम्मू काश्मीर मध्ये झालेल्या दहशतवादी हल्यामध्ये कर्नल संतोष यशवंत महाडिक हे शहीद झाले यांना श्रध्दाजंली वाहण्यासाठी आपण सर्वांनी उभे रहावे, ही विनंती.

मा.अध्यक्षा–दाखलचे विषय सुरू करावेत.
नगरसचिव– दाखल विषय सुरू करीत आहोत.

## दाखल विषय

**दाखल विषय क्र–१५९४/ठराव क्र.१५९४**

पुणे मनपा शिक्षण मंडळाचे सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रका बाबत झालेला मा.शिक्षण मंडळ ठराव क्र. ७६ दि. ३१/८/२०१५ वर मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०८,दि.१५/९/२०१५ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/६०० दि.१०/११/२०१५ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
नगरसचिव–या विषयाचा अभिप्राय आलेला आहे.
मा.अध्यक्षा–हा विषय खास सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार खास सभेत करावा.

**दाखल विषय क्र–१५९५/ठराव क्र.१५९५**

भैरोबा नालामध्ये मुख्य मलवाहिनी टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९८,९६,९८३/- पेक्षा ३५.२९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६४,०४,३३७=७० अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मलनि/६०२ दि. १६/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१५९६/ठराव क्र.१५९६**

रावत ब्रदर्स ते ट्रेझर पार्क पर्यंतचा रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वामीराज एंन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,९८२=५० पेक्षा २१.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,३९,९८६=२१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६०३ दि.१६/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१५९७/ठराव क्र.१५९७**

प्रभाग क्र. १२ अ मॉडेल कॉलनी कॅनॉल रस्ता कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,५९,२७,४२७=५५ पेक्षा १९.१९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,०९,५१,९५४=२० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६०४ दि.१६/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१५९८/ठराव क्र.१५९८**

जेएनएनयुआरएम अंतर्गत बंडगार्डन बंधाऱ्यास लोखंडी गेट बसविणे या कामाचे मुळ पूर्वगणनपत्रक रक्कम रूपये १०,०१,३४,६०३/- चे कामामध्ये वाढीवे परिमाणाची रक्कम रू. २,४१,१०,८४७/- इतक्या रक्कमेच्या कामासह एकूण रक्कम

रुपये १२,४२,४५,४५०/- पर्यंतचे काम महाराष्ट्र शासनाचे पाटबंधारे विभागाकडून अनामत ठेव पध्दतीने करणेस, त्यानुसार रक्कम टप्प्याटप्प्याने अदा करणेस व त्यांचेशी सुधारित करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/६१२ दि.१७/११/२०१५ चे पत्र.
मा.अध्यक्ष-हा विषय मान्य करावा.
**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र-१५९९/ठराव क्र.१५९९**

प्रभाग क्र. २१ बोटक्लब रोड फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७८,७९,९७७/- पेक्षा २०.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६२,८८,२२१=६४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६१३ दि.१७/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र-१६००/ठराव क्र.१६००**

भैरोबा नाल्याच्या कडेने नेताजीनगर ते कोंढवा बु. पर्यंत ७६७० ते ११ कि.मी. मुख्य मलवाहिनी टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६८,३८,२४३/- पेक्षा ३१.६९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४६,७१,२०३=७९ अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मलनि/६१४ दि. १७/११/२०१५ चे पत्र.
मा.अध्यक्षा-हा विषय मान्य करावा.
**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र-१६०१/ठराव क्र.१६०१**

प्रभाग क्र. ३६ अ मधील गल्ली क्र. ६,७,८ व विविध रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,२७,११,६९७/- पेक्षा २२.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,५३,४८,२९४=०१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६१५ दि.१७/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र-१६०२/ठराव क्र.१६०२**

मीठानगर, भाग्योदय नगर अंर्तगत रस्ते, शिवनेरी नगर अंर्तगत रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी.पध्दतीने कॉंक्रिटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८५,५०,३११/- पेक्षा १७.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७०,५४,००६ =५७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६१६ दि.१७/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र-१६०३/ठराव क्र.१६०३**

प्रभाग क्र. ३१ मधील स.नं.१२ मी.डी.पी. रोड व शाहू कॉलनी रोडचे यु.टी.डब्ल्यू.टी. पध्दतीने काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६४,९९,९५४/- पेक्षा २१.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५१,२७,८१३ =७१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६१७ दि.१७/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६०४/ठराव क्र.१६०४**

पुणे रेडिएटर ते माळवाडी पर्यंत सं.क्र. २१६ ते २२३ मनपा हद्दीवरील जाणारा रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६७,८४,८१८/– पेक्षा १७.७७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५५,७९,१५५=८४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६१८ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६०५/ठराव क्र.१६०५**

प्रभाग क्र. ८ औंध मुख्य.डी.पी. रस्ता पेव्हरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एस. के. येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,८७८/– पेक्षा १८.२१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७,९७,११८=२२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६१९ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६०६/ठराव क्र.१६०६**

प्रभाग क्र. ६२ ब कोंढवा बु. येथे विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. ज्ञानेश निंबाळकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,९७०/– पेक्षा २२.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३१,०९,१७६=६८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६२० दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६०७/ठराव क्र.१६०७**

प्रभाग क्र. ५४ ब मध्ये बेनकर वस्ती पारी कंपनी रोडवरील पुलाची रुंदी वाढविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वामीराज एंन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३८,९७,४५०/– पेक्षा १७.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३२,११,४९८=८० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६२१ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६०८/ठराव क्र.१६०८**

पथ विभागाकडील कार्यकारी अभियंता क्र. २ ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी फुटपाथ विषयक व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अभिजित एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,९९७/– पेक्षा २३.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,२४,४९७=७० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६२२ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६०९/ठराव क्र.१६०९**

पुणे शहरातील बेनकर चौक, गोळीबार मैदान, अशोका फ्यूजन, सावंत पंप चौक रस्ता त्रिमुर्ती चौक व इतर ठिकाणी विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ९८,७६,१२०=७१ पेक्षा २०.००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु.७९,००,८९६=५६ रकमेपर्यंत अधिक टेंडर अटी/शर्तीमध्ये नमुद भाववाढ सुत्रानुसार निर्धारीत होणारी वाढ अथवा घट ही स्विकृत होऊन काम करुन घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/६२३ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६१०/ठराव क्र.१६१०**

पुणे शहरातील नेहरु चौक, फातिमानगर जंक्शन, मुंढवा जंक्शन चौक व इतर ठिकाणी विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,८६,४०६=७१ पेक्षा २०.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७९,८८,१२६=७२ रकमेपर्यंत अधिक टेंडर अटी/शर्तीमध्ये नमुद भाववाढ सुत्रानुसार निर्धारीत होणारी वाढ अथवा घट ही स्विकृत होऊन काम करुन घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/६२४ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६११/ठराव क्र.१६११**

प्रभाग क्र. ६८ मध्ये ढुमे क्रिडा संकुला जवळील नाल्यावर कल्व्हर्ट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वामीराज एंन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,४८,६०२/– पेक्षा १७.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून  र.रु.३२,५३,६४८=०४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६२५ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६१२/ठराव क्र.१६१२**

प्रभाग क्र. ७३ मधील आंबिल ओढयाच्या कडेने सिमाभिंत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.पी.खोडदे अॅन्ड कंपनी यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,४८,५९४/– पेक्षा २६.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,०९,२१०=९७ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मलनि/६२८ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६१३/ठराव क्र.१६१३**

सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील झाडण हद्दीतील कामे आउट सोर्सिंगने करणे याकरिता  खालीलप्रमाणे र.रुपये९,७७,५०,०००/–वर्गीकरणाद्वारे तरतूद उपलब्ध करून देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/घनकचरा/६३१ दि.१७/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–कर्मचाऱ्यांचे पगार द्यावे लागतात.
मा.सौ.मुक्ता टिळक–हे टेंडर आहे की, वर्गीकरण आहे?
नगरसचिव–हे वर्गीकरण आहे.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र– १६१४/ठराव क्र.१६१४**

विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तुमधील टॉयलेट दुरुस्ती, लाकुड काम दुरुस्ती व विविध सुशोभिकरणाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विशाल अॅन्ड आकाश असोसिएटस यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,८९,६६२/– पेक्षा १८.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०,७६,५५३=८५ रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे क्र.मआ/भवन/६३६ दि.१८/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६१५/ठराव क्र.१६१५**

प्रभाग क्र. ५५ स.नं. ३५ ते ४० (पार्ट) वडगाव बु. येथील शाळेसाठी आरक्षित असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर श्री.शरदचंद्रजी पवार ॲकॅडमी ऑफ ई–लर्निंग स्कुल उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.सलिम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,५७,९८,८६१/– पेक्षा १८.८६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२८,१९,१९५=८१ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारा फरक अदा अथवा कपात करणे ही अट स्विकृत होऊन त्यानुसार त्यांचेकडून काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे क्र. मआ/भवन/६३८ दि.१८/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६१६/ठराव क्र.१६१६**

प्रभाग क्र. २ अ, स.नं. ४ येथील अर्धवट असलेले स्पोर्टस् गॅलरीचे काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पंडीत लक्ष्मण उंदरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८४,५१,०५८/– पेक्षा २४.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६४,१४,३५३=०२ रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/भवन/६३९ दि.१८/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६१७/ठराव क्र.१६१७**

सुरक्षा विभागाकडील खाजगी सुरक्षा रक्षक मदतनीस बंदुकधारी मदतनीस पुरविणे या कामासाठी रक्कम रू. १८६०.००लाख उपलब्ध होणे अनिवार्य आहे. परंतू अखर्चित रकमेमधून रक्कम उपलब्ध करून द्यावयाची झाल्यास सदर बाबत मा. आयुक्त महोदय यांचा निर्णय अंतिम असेल असा धोरणात्मक निर्णय यापूर्वी झालेला आहे. त्यामुळे मा. महापालिका आयुक्त अंतिम मंजुरी देतील या भरवशावर अखर्चीत रकमेतून सदर रक्कम उपलब्ध होणेस अथवा विविध खात्यांच्या बजेट हेड मधून सदर रक्कम उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र. १४९४ दि. ३/११/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(इ) यांनी जा. क्र. मआ/सुवि/६४० दि.१९/११/२०१५ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

मा.अध्यक्षा–हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ठीक आहे, कार्यपत्रिकेवर घ्यावा.

मा.अविनाश बागवे–मग हा विषय सुध्दा पुढील आठवड्यात घ्यावा. तुम्ही एक न्याय वेगळा करीत आहात एक न्याय वेगळा करीत आहात. तुम्ही आता हे दफ्तरी दाखल करावे, असे म्हणत आहात मग तुम्हाला हा विषयच पुढे घेतला पाहिजे.

मा.अध्यक्षा–फेरविचाराचा विषय, दफ्तरी दाखल करावा.

मा.अविनाश बागवे–तुम्ही जर फेरविचार दफ्तरी दाखल करावा, असे म्हणत आहात आणि हे त्याच्याशी निगडीत आहे. मग त्यांचा अभिप्राय काय आहे? ते वाचून दाखववावे. हे सारे ऑन रेकॉर्ड येऊ द्यावे. तुमचा जर निर्णय असा असेल की, एक आठवडा पुढे घेउन चर्चा करून हा विषय दफ्तरी दाखल करावयाचा असल्यांस आमचे काहीही म्हणणे नाही परंतु तो विषय पुढे घ्यायचा आणि हा दफ्तरी दाखल करायचा हे तुम्ही कसे काय करीत आहात? हे चुकीचे होईल.

मा.सौ.मुक्ता टिळक–हे सगळे एकत्र करावे.

मा.अविनाश बागवे–हे एकत्र केले तर आपण चर्चा करू शकतो. नाहीतर तुम्ही आता हे दफ्तरी दाखल करणार. मग हे कसे होणार? आपण आता सगळे संविधान मार्गाने सगळे करण्याबाबत प्रतिज्ञा करून आलो आहोत. आपण सगळे कायद्यानुसार करावे, असे ठरविले आहे.

नगरसचिव–१५७५ हा विषय वेगळा आहे आणि जो विषय अभिप्रायसाठी पाठविला होता तो अभिप्राय आलेला आहे.

मा.अविनाश बागवे–तो त्याचाच आहे.

मा.अध्यक्षा–नाही, आधीचा कार्यपत्रिकेवरील विषय आपण दफ्तरी दाखल करीतच आहोत आणि हा अभिप्राय मान्य करीत आहोत.

मा.अविनाश बागवे–हा अभिप्राय वाचून दाखववावा. हा अभिप्राय कशाचा आहे? तो वर्गीकरणाचा आहे का?

नगरसचिव–होय.

मा.अविनाश बागवे–आमचा फेरविचार सुध्दा वर्गीकरणाचाच आहे तो त्याच ठरावाचा आहे. हे चुकीचे होईल ते कायद्याला धरून होणार नाही. आपण या विषयावर सविस्तर चर्चा करावी आणि मग तुम्हाला जे काही करायचे आहे ते करावे. अन्यथा तुम्हाला जर पुढील आठवड्यात चर्चा करावयाची असेल तर हा विषय सुध्दा पुढील आठवड्यात घ्यावा आणि एकत्र चर्चा करावी.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–इथे जे करायचे आहे ते बहुमताने करायचे आहे.

मा.अविनाश बागवे–जे काही बहुमताने करायचे आहे ते ऑन रेकॉर्ड घेऊ द्यावे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही काहीच बोललो नाही.

मा.अविनाश बागवे–तुम्ही ते वाचून सुध्दा देत नाही आणि अभिप्राय पुढील आठवड्यात चर्चेला घ्यावयाचा आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही बहुमताने तसे म्हणत आहोत. नगरसचिव हा अभिप्राय कार्यपत्रिकेवर घ्यावा आणि हा विषय दफ्तरी दाखल करावा
मा.अध्यक्षा–हा विषय दफ्तरी दाखल करावा आणि हा अभिप्राय कार्यपत्रिकेवर घ्यावा.
नगरसचिव–सुरक्षा विभागाचा जो दाखलसाठी विषय आला होता. तो कार्यपत्रिकेवर घेत आहोत.
मा.अविनाश बागवे–नाही, माझे ऐका आपल्याला जर हा विषय दफ्तरी दाखल करावयाचा असेल तर तो अभिप्राय कार्यपत्रिकेवर का घेत आहात? आम्ही त्यासाठी विरोध करीत आहोत. आम्हाला ते आता वाचून दाखववावे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्ही विरोध करा, आमचे काहीही म्हणणे नाही.
मा.अविनाश बागवे–याबाबत प्रशासनाने सांगावे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नेते आपण मा.स्थायी समितीच्या प्री–मिटींग मध्ये यावयास हवे होते.
मा.अविनाश बागवे–साहेब, तुम्ही मा.स्थायी समितीच्या प्री–मिटींगबाबत काल सकाळी दूरध्वनीवरून निरोप दिला आहे आणि ऑडीटची बैठक १० दिवसांपूर्वी ठरली होती. ही बैठक ठरली नव्हती. ते सगळ्या सभासदानी मिळून ठरविले होते. आपल्या सगळयांना कार्यपत्रिका मिळाली होती तर आपण सकाळीच प्री–मिटींग घ्यायला पाहिजे होती. आम्ही सकाळी आलो असतो. आपल्याला या विषयावर चर्चा करायची नाही का?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय दफ्तरी दाखल करावा आणि अभिप्राय कार्यपत्रिकेवर घ्यावा, असे आमचे ठरले आहे.
मा.अविनाश बागवे–मा.सभागृहनेते आमची पूर्वीपासून अशी भूमिका आहे की, या कामासाठी १८ कोटी २५ लाख रू.नव्हेत तर यासाठी २५ कोटी रू.आवश्यक असतील तरी सुध्दा ते द्यावेत. आमची काहीही अडचण नाही. पण ते योग्य ठिकाणी झाले पाहिजे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ते या लोकांना पगार देण्यासाठी वर्गीकरण करीत आहेत.
मा.अविनाश बागवे–मा.स्थायी समितीचा ठराव काय झाला होता? मा.महा.आयुक्त साहेब यांचे कार्यालयीन आदेश काय आहेत? प्रशासन काय काम करीत आहे? ते हा खर्च कोठे करीत आहेत? आपण एका गोष्टीसाठी मान्यता देतो परंतु ते दुसरी गोष्ट करतात आणि आपण यासाठी होय कसे म्हणावे?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुमचे बरोबर आहे.
मा.अविनाश बागवे–चर्चा करायची असेल तर सगळ्या गोष्टींवर विस्तारीत चर्चा करा. नाहीतर हा विषय पुढील आठवड्यामध्ये घ्यावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.अध्यक्षा, हा विषय दफ्तरी दाखल करावा आणि हा अभिप्राय अजेंड्यावर घ्यावा.
मा.अविनाश बागवे–नाही, मला त्यावर बोलायचे आहे. मला त्यावर काही खुलासे हवे आहेत. मग तुम्ही निर्णय घ्यावा.
नगरसचिव–हा विषय, आता दाखलसाठी जो अभिप्राय आला होता तो आता अजेंड्यावर घ्यायचा आहे.
मा.अविनाश बागवे–साहेब, त्याविषयीच चर्चा करायची आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे कार्यपत्रिकेवर घ्यायचे आहे.
मा.अविनाश बागवे–मा.पारखी साहेब, हे सुसंगत आहे का? याबद्दल तुम्ही माहिती द्यावी. हा जर त्या विषयाचा फेरविचार आहे आणि त्या विषयाचा अभिप्राय आला असेल तर तुम्ही ते वेगळे कसे काय करू शकता?
नगरसचिव–आपण एक लक्षात घ्यावे की, हा शेवटी समितीचा निर्णय असतो. हा निर्णय करण्याचा अधिकार समितीचा आहे. हा अधिकार माझा नाही.
मा.अविनाश बागवे–सगळे निर्णय समिती करते. नगरसचिव निर्णय करीत नाही.
नगरसचिव–समितीने असे सांगितले आहे की, हे अजेंड्यावर घ्यायचे आहे.
मा.अविनाश बागवे–हे सुसंगत आहे का? ते ऑनरेकॉर्ड सांगावे.
नगरसचिव–साहेब, यामध्ये सुसंगत, विसंगत असा विषय येऊ शकत नाही. विषय एक असला तरी हे दोन्ही विषय स्वतंत्र आहेत. त्यामुळे त्यावर वेगळे निर्णय करावे लागतील.
मा.अविनाश बागवे–हे दोन्ही विषय एकमेकांशी निगडीत नाहीत का?
नगरसचिव–मी असे सांगत आहे की, कार्यपत्रिकेवर जे विषय येत आहेत. ते स्वतंत्र आलेले आहेत. त्यामुळे त्यावर स्वतंत्र निर्णय करावा लागेल.
मा.अविनाश बागवे–यापूर्वी देखील दोन, दोन विषय येत होते तेव्हा देखील आपण एकत्र करूनच केले आहेत.
नगरसचिव–साहेब, हा निर्णय समितीने घ्यायचा आहे. मी याबाबत निर्णय घेऊ शकत नाही. हा निर्णय समितीने घ्यायचा आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.अध्यक्षा, आता समितीने ठरविले आहे की, हा अभिप्राय कार्यपत्रिकेवर घ्यावा.
नगरसचिव–सुरक्षारक्षक विभागाचा विषय आलेला आहे,''सुरक्षारक्षक विभागाचे सुरक्षारक्षक मदतनीस, बंदूकधारी मदतनीस पुरविणे, या कामासाठी..
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय वाचून दाखवावा. हा विषय काय आहे?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयाबद्दल माहिती घ्यावी. आमचा काहीही प्रॉब्लेम नाही.
मा.अध्यक्षा–प्रशासनाने जो अभिप्राय दिला आहे त्याबद्दल खात्याने माहिती द्यावी.

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–मा.स्थायी समिती ठ.क्र.२२/९/२०१५ नुसार आणि कार्यपत्रिका क्र.२७दि.२२/९/२०१५, विषय क्र.११६८ प्रमाणे, मा.अविनाश बागवे यांनी विचारलेल्या प्रश्नांना अनुसरून सुरक्षा विभागाने माहिती सादर केली आहे. टेंडर क्र. १/२०१४, पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालयांना महत्वाच्या ठिकाणी सुरक्षारक्षक मदतनीस पुरविणे या कामासाठी सन २०१५–१६ या आर्थिक वर्षातील कामाकरीता सुरक्षा विभागाकडील बजेट आर.आय.११३०, र.रू.१०२० लक्ष व पाणी पुरवठा विभागाकडील २४० लक्ष रू.तरतूद उपलब्ध झाली आणि एकूण १२६० लक्ष रू.तरतूद उपलब्ध झाली. निविदा क्र.१, २०११ अन्वये, नियुक्त करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांचे बिल, नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अदा करणेस मा.स्थायी समिती ठ.क्र.१३०२ दि.२२/१०/१३ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मा.स्थायी समिती ठ.क्र. २१९७, दि.२२/२/२०१५ अन्वये, खाजगी सुरक्षारक्षक पुरविणे या कामासाठी ६६८.८९ लाख रू.वर्गीकरण करण्यास मान्यता दिली आणि त्यानुसार मा.मुख्यसभेकडे मान्यता करणेसाठी शिफारस करण्यात आली होती. सदर मा.मुख्यसभा विषय क्र.७२५, हा मार्च २०१५ च्या सभेपुढे मान्यतेसाठी प्रलंबित होता. सदर विषय वेळेत मंजूरी न मिळाल्याने, सदर विषयास वेळेत मंजूरी न मिळाल्याने सदर विषयात कालाअपव्य झाल्यामुळे सदरचा विषय दफ्तरी दाखल करावा लागला. र.रू.६६८.८९ लाख ही रक्कम फेब्रुवारी २०१५ पर्यंत खर्च, असे गृहीत धरण्यात आले होते. परंतु दि.३१ मार्च २०१५ अखेरीस, मार्च महिन्याच्या बिलाची रक्कम, त्यामध्ये जमा झाल्याने र.रू.७७४.१८ लक्ष इतका खर्च झाला आहे. त्यामुळे र.रू.६६८.८९ लाख ऐवजी ७६४.१८ इतका खर्च झाला आहे.

मा.अविनाश बागवे–मा.भोसेकर साहेब, हे आपण काय वाचत आहात? आपण अभिप्राय दिलेला वाचत आहात की, अहवाल वाचत आहात? याबद्दल माहिती द्यावी.

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–हा अभिप्राय डिटेल्स, जुनी रक्कम का वर्ग करावी लागली? याचा खुलासा व अभिप्राय आहे.

मा.अविनाश बागवे–मागील वेळेस जे वर्गीकरण केले त्याबाबतचा अभिप्राय आहे का?

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–आपण असा प्रश्न विचारला आहे की, मागील वर्षात तरतूद का कमी पडली? दि.३१ मार्चच्या आधी मान्य का झाले नाही? याबाबत माहिती देत आहोत.

मा.अविनाश बागवे–परंतु यावर आता चर्चा करून त्याचा फायदा काय?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–आपण या विषयावर मा.मुख्यसभेत व न्यायालयात काम करू.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये किती सुरक्षारक्षक होते आणि रक्कम किती होती? याबद्दलची माहिती द्यावी.

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–मा.स्थायी समितीने त्यावेळी ११०० च्या आसपास मान्यता दिली होती आणि त्यावेळी आवश्यकता असेल त्याप्रमाणे यामध्ये वाढ करण्याची मुभा देण्यात येत आहे, असे त्यामध्ये नमूद केले होते.

मा.राजेंद्र शिळीमकर–म्हणजेच मान्यता घेतली होती.

मा.अविनाश बागवे–अशी टेंडर स्टॅटेजी असते का? तुम्ही जो सन २०१३ चा ठराव सांगत आहात.

मा.अध्यक्षा–मा.सौ.मुक्ता टिळक, आपण प्रश्न विचारत आहात.

मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही जे ७६४ लक्ष रू प्रत्यक्ष खर्च सांगत आहात. तो किती सुरक्षारक्षकांसाठी केला आहे.

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–१३६५ सुरक्षारक्षक.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपण किती सेवकांसाठी मान्यता दिली आहे?

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–११०० प्लस आवश्यकतेनुसार..

मा.सौ.मुक्ता टिळक–आता किती सेवक आहेत?

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–१६११ सुरक्षारक्षक आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–आता आपल्याला या १६११ सुरक्षारक्षकांना पैसे द्यायचे आहेत मग आपल्याला वेगवेगळया तरतुदीतून वर्गीकरण करावे लागेल. या सुरक्षारक्षकांकडून खरोखर सुरक्षा होते का? याचे ऑडिट कोणी केले आहे का?

(सभागृहात गोंधळ होता)

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये ज्या बिचाऱ्या महिला सुरक्षारक्षक काम करतात आणि आपण त्याच्या कामाबाबत आक्षेप घ्यायचा का?

(सभागृहात गोंधळ होता)

मा.अध्यक्षा–सभासदानी आपआपसात बोलू नये. एकावेळी एकाच सभासदाने बोलावे.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपल्याला खरोखर १६०० सुरक्षारक्षकांची गरज आहे का? आपण याचे ऑडीट केले आहे का? त्या गरीब सेवकांना व्यवस्थित पगार मिळावा, याबद्दल आमचे दुमत नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही असे म्हंटले नाही. आम्ही असे म्हंटले की, तुम्ही असे म्हणतात की, ते सुरक्षारक्षकाचे करतात की नाही? आणि त्याला आम्ही आक्षेप घेतला की, असे होत नाही. ते बिचारे सुरक्षा करतात. कारण ते उभे राहतात, काम करतात. त्यामध्ये काही महिला आहेत आणि त्या सुध्दा सुरक्षारक्षकाचे काम करतात आणि त्यांच्या कामाबद्दल आपण आक्षेप घेणे हे बरे नाही, असे मी माझे मत मांडले आहे. धन्यवाद..

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये आम्हाला असे वाटते की, आपल्या महानगरपालिकेकडे ठेकेदारांनी यामध्ये जास्त, ॲडीशनल सुरक्षारक्षकांची नोंदणी केलेली आहे आणि त्यामुळे हा महानगरपालिकेवरील बोजा आहे. हा बोजा आहे की नाही? याचे ऑडीट प्रशासनानेच केले पाहिजे.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–महानगरपालिकेमध्ये जेव्हा ही टेंडर प्रोसेस चालू होती तेव्हा आपल्याला एकूण किती सुरक्षारक्षक लागतील याबाबत आम्ही खातेनिहाय मागणी केली होती, त्याचा अहवाल मागविला होता. त्यामध्ये जवळपास १९१८ अशा वेगवेगळ्या स्पॉटवर सुरक्षारक्षक हवे आहेत, अशी मागणी आली होती. त्या मागणीच्या अगेन्स्ट, सिक्युरिटी विभागाच्या माध्यमातून, प्रत्येक स्पॉटवर जाऊन प्रत्येक ठिकाणी किती सुरक्षारक्षक आवश्यक आहेत? याबाबतचा अहवाल मागविला होता. त्यामध्ये १७२२ सुरक्षारक्षक रिक्वॉयर्ड आहेत, असे सांगितले होते. आपण सगळ्या ठिकाणी पाहिजेत तेवढ्या प्रमाणात पूर्तता करू शकत नव्हतो. परंतु अत्यावश्यक ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता असेल, त्या मागणीच्या अनुषंगाने आता १६११ ची मागणी आहे. यामध्ये असे होते महानगरपालिकेच्या नवीन नवीन, समजा नवीन गार्डन निर्माण झाले असेल किंवा नवीन इमारत बांधली असेल किंवा नवीन काही खात्याच्या माध्यमातून होत असेल, त्या मागणीला आपल्याला सिक्युरेटी देणे या दृष्टीकोनातून ही वाढ होत आली आहे. मागील ३ ते ४ वर्षामध्ये हे करीत असताना काही ठिकाणी पोलीसांच्या माध्यमातून सुध्दा सूचना आल्या आहेत की, प्रत्येक ठिकाणी सुरक्षारक्षकांची नेमणूक करावी, सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसवावेत, अशी वेगवेगळी पत्रे येतात आणि त्या अनुषंगाने मागील ३ ते ५ वर्षामध्ये ही वाढ झाली आहे. या खात्याकरीता लागणारी तरतूद त्या त्या विभागामध्ये त्या त्या बजेटमध्ये होती. चालू वर्षामध्ये आम्ही त्यामध्ये दुरूस्ती करून, संपूर्ण एकत्रित केंद्रीकरण करून एका ठिकाणी आणले आहे की,यामुळे सिंगल टेंडर काढून हे पेमेंट व्हावे. कारण मागील ३ वर्षामध्ये असे होत आहे की, यामध्ये एकूण असलेली तरतूद आणि झालेली इम्पलॉयमेंट यामध्ये फरक होता आणि प्रत्येकवर्षी या सेवकांना पगार देण्यामध्ये अडचण येत होती. अत्यावश्यक सेवा असल्यामुळे कोणत्याही ठिकाणी आपल्याला कोणतीही अडचण येऊ नये आणि यामध्ये जी कमी पडलेली रक्कम आहे ती वेगवेगळ्या विभागाकडे उपलब्ध असलेली रक्कम वर्गीकरणाने उपलब्ध होण्यासाठी हा प्रस्ताव आणला आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–सांस्कृतिक केंद्रासाठी किती सुरक्षारक्षक आहेत?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–यामध्ये सगळे आले आहेत. यामध्ये झोनवाईज केले आहेत. झोनमध्ये २२८ सेवक आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये २२८ सेवक महापालिकेचे आहेत का? आपण त्यांना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच पगार देतो का? यामध्ये पुणे महानगरपालिकेचे एकूण सेवक किती आहेत?

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–एकूण कायम सेवक ५१८ आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपल्याला तेवढेच सेवक घेण्याची परवानगी आहे का? आपल्याकडे या एकूण जागा किती आहेत?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–आपल्याकडे एकूण ६५० पदे आहेत आणि तरीसुध्दा वेगळे सेवक घ्यावे लागतात.

मा.सौ.मुक्ता टिळक–म्हणजे आपण आणखी १०० सेवक घेऊ शकतो.

मा.भोसेकर,(प्र.सुरक्षाप्रमुख)–नवीन रिक्रूपमेंट बंद आहे आणि इक्रीमेंट वाढत आहे.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)– यामध्ये उद्यान,पाणी पुरवठा, सांस्कृतिक केंद्र, भूमी जिंदगी या ठिकाणी किती सेवक देण्यात आले आहे? याबाबतची माहिती आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–ती माहिती सर्व मा.सभासदाना देण्यात यावी.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–आरोग्य विभागाकडे ३१२ सुरक्षासेवक, सेवकवर्ग विभागाकडे ५ सुरक्षासेवक, भूमी जिंदगी विभागाकडे १६ सुरक्षासेवक, शाळांमध्ये ४० सुरक्षासेवक, उद्यान विभागाकडे ५ सुरक्षारक्षक, कोठी विभागाकडे ८ सुरक्षारक्षक, स्टेडियम क्रीडासंकुले ५९ सेवक, भुयारी मार्गांसाठी २९ सुरक्षासेवक, अतिक्रमण विभागासाठी २९ सुरक्षारक्षक आणि इतर ११७ ठिकाणांसाठी हे सेवक देण्यात आले आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–असे एकूण किती सेवक आहेत?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–१३०२ सेवक आहेत.

मा.अध्यक्षा–हा विषय दाखल मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६१८/ठराव क्र.१६१८**

पुणे मनपा भवन येथे विस्तारीत इमारतीचे बांधकाम करणे या कामासाठी खालीलप्रमाणे र.रुपये १.४७ कोटी वर्गीकरणाने तरतुद उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/भवन/६४५ दि.१९/११/२०१५ चे पत्र.

मा.सौ.मुक्ता टिळक–हे वर्गीकरण कशातून घेतले आहे?

नगरसचिव–७ आरोग्य विभाग नायडू हॉस्पीटल प्रोजेक्टसाठी १५ लाख रू.आहेत. ताडीवाला रोड, राजगुरू हॉस्पीटलचे बांधकाम पूर्ण करणे, २३ लाख रू, भवन विभागाकडून विविध विकासाची कामे करणे यामध्ये शिवाजीनगर न्यायालय परिसरात पक्षकारांना नागरी सुविधा देणे ३० लाख रू., मनपा कर्मचाऱ्यांकरिता निवासी इमारत बांधणे यासाठी १३२ लाख रू.आणि पथारी व्यवसायिकांसाठी शहरात विविध ठिकाणी ओटा मार्केट बांधणे २ कोटी रू. असे मिळून ४ कोटी रू.चे वर्गीकरण आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.

मा.अध्यक्षा–मागील वेळेस आपण प्रशासनाला अशी माहिती विचारली होती की, जी कामे होणार नाहीत, त्या तरतुदीतून हे वर्गीकरण सुचवावे.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपल्याला ओटा मार्केटची आवश्यकता नाही का? याबाबतची माहिती द्यावी.

मा.माधव जगताप,उपायुक्त(अतिक्रमण)–ओटा मार्केटची आवश्यकता आहे.
मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–त्यामध्ये ३२ लाख रू.ठेवले आहेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–अतिक्रमण विभागाला ओटा मार्केटसाठी तरतूद आवश्यक नाही का? या विभागाकडे शिल्लक निधी उपलब्ध आहे का?
मा.जगताप,उपायुक्त(अतिक्रमण)–ओटा मार्केटसाठी १ कोटी १७ लाख रू.ची तरतूद आहे आणि ती आवश्यक आहे आणि आम्ही याबाबतचे प्लॅनिंग केले आहे. आपण आता मार्केटच्या ठिकाणी ओटा मार्केट करीत आहोत, त्यामुळे तरतूदीची आवश्यकता आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या कामासाठी जेवढा निधी आवश्यक आहे तो उपलब्ध करून द्यावा.
मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–आता तरतुदी अभावी काम बंद राहणार आहे.
मा.अध्यक्षा–त्यामुळे यामध्ये मा.सभासदाचे स यादीतील काही असतील किंवा एखाद्या खात्याकडील तरतूद असेल आणि ती त्यांना आवश्यक असेल. याबाबत त्या त्या खात्यांना विचारावे आणि उर्वरित तरतूद याकामासाठी उपलब्ध करून द्यावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये ओटा मार्केटचे पैसे वर्गीकृत केले आहेत आणि ओटा मार्केटची गरज आहे.
मा.अध्यक्षा–आतापर्यंत ओटा मार्केटचे काम का केले नाही? याबाबत माहिती द्यावी.
मा.जगताप,उपायुक्त(अतिक्रमण)–आता आम्ही बरेचसे प्रस्ताव तयार केले आहेत. त्यातील काही अभिप्रायसाठी गेले आहेत.
मा.अध्यक्षा–सर, तुम्ही हे मार्च मध्ये देणार आहात का?
मा.जगताप,उपायुक्त(अतिक्रमण)–दि.१५ डिसेंबर पर्यंत सर्व कामकाज पूर्ण होणार आहे.
मा.अध्यक्षा–तुम्ही जर असे कामकाज करीत असाल तर पुणे शहराचा विकास काहीच होणार नाही.
मा.जगताप,उपायुक्त(अतिक्रमण)–आतापर्यंत ही तरतूद नव्हती.
मा.अध्यक्षा–या खात्याचे काम व्हायला नको आणि त्या खात्याचे काम व्हायला नको, असे करू नका. प्रत्येक खात्याच्या सभासदाने याकडे लक्ष द्यावे. आम्ही आपणास एक महिन्यापासून सांगत आहोत की, अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार कामे सुरू करा आणि याबाबत आपल्याकडून माहिती मागविली तरी ती आपल्याकडून येत नाही. मग आता आम्ही सविस्तर माहिती घेऊन काम सुरू करायचे का? तुमच्याकडे अधिकार आहेत आणि त्या अधिकाराचा वापर करून तुम्ही कामे करीत नसाल तर, मग आम्ही काय करणार? मग आम्ही मा.सभासदाना तो निधी उपलब्ध करून देणार. आणखी कोणत्या खात्याच्या तरतुदीचे वर्गीकरण यामध्ये घेतले आहे? याबाबत माहिती द्यावी.
नगरसचिव–नायडू हॉस्पीटल प्रोजेक्ट या कामातील १५ लाख रू.कमी केले आहेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–या विषयाबद्दल माहिती द्यावी.
मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–या प्रोजेक्ट मध्ये डॉक्टरांसाठी कॉलेज बांधावयाचे होते. या प्रकल्पाला मागील दोन वर्षापासून तरतूद उपलब्ध होती आणि या कामासाठी आता ३५ लाख रू.ची तरतूद आहे आणि या रक्कमेमध्ये हे काम होणार नाही.
नगरसचिव–ताडीवाला रोड, राजगुरू चौकातील हॉस्पीटल बांधणे.
मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–या कामासाठी २५ लाख रू.ची आवश्यकता होती, ती २५ लाख रू.ची तरतूद आपण ठेवलेली आहे आणि २३ लाख रू.घेतले आहेत. तसेच भवन विभागामार्फत न्यायालय परिसरामध्ये जे काम करायचे आहे त्यामध्ये न्यायालयातील स्वच्छतागृह आणि पी.एम.सी.ची कोठी, एक केबीन आहे, याची दुरूस्ती करणेसाठी १० लाख रू.ठेवले आहेत आणि त्यातील बाकीचा निधी इकडे घेतला आहे.
मा.राजेंद्र शिळीमकर–हे काम १० लाख रूपयांमध्ये होणार आहे का?
मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–होय, केबीन लहान आहे. तसेच दुसरी तरतूद १२ भवने, भूमी मधील कर्मचाऱ्यांकरिता निवासी इमारत बांधणे याकामी १ कोटी रू.ची तरतूद आहे आणि यामध्ये १२ लाख रू.ठेवले आहेत. कारण आपल्याकडे आता ज्या निवासी इमारती आहेत त्यातील ९ इमारतीचे काम बी.ओ.टी.तत्वावर केले आहे. यामधील एक ६ नंबर कॉलनीतील एका इमारतीचे काम पूर्ण झाले आहे आणि इतर जे दोन प्रोजेक्ट आहेत ते करारनाम्यावर बी.ओ.टी.तत्वावर सुरू आहेत आणि इतर ५ जे आहेत ते मा.स्थायी समितीच्या ठरावाच्या विरोधात हायकोर्टात गेले आहेत. तसेच शहरामध्ये पथारीवाल्यांसाठी ओटा मार्केट बांधणे याकामी खात्यामार्फत २ कोटी १६ लक्ष रू.ची तरतूद उपलब्ध झाली होती. ती तरतूद आम्ही घेतली आहे कारण आता जे पार्किंग आणि अप्पर बेसमेंट पार्किंगचे जे काम होईल आणि सध्या आपल्याला या ठिकाणी वाहनतळाचा जो प्रश्न भेडसावत आहे आणि तो सुटण्याकरिता म्हणून मार्च एंडपर्यंत पार्किंगचे दोन्ही स्लॅब पूर्ण करून पार्किंगची इमारत वापरता येणे शक्य आहे आणि त्याठिकाणी साधारणत: २०० फोर व्हिलर्स, कार पार्किंग होऊ शकतील आणि त्याकरिता ही तातडीने मागणी केली आहे.
नगरसचिव–यातील ७.आरोग्य विभाग डॉ.नायडू हॉस्पीटल प्रोजेक्ट, आणि मनपा कर्मचाऱ्यांकरिता निवासी इमारत बांधणे या दोन्हीच्या रकमा मिळून १ कोटी ४७ लाख रू.चे वर्गीकरण मान्य करण्यात यावे.
मा.अध्यक्षा–ठीक आहे, १ कोटी ४७ लाख रू.चे वर्गीकरण मान्य करावे.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून १ कोटी ४७ लाख रू.चे वर्गीकरण मान्य करण्यात आले.

**दाखल विषय क्र–१६१९/ठराव क्र.१६१९**

प्रभाग क्र. ५१ अ मध्ये मा.रमाबाई आंबेडकर रुग्णालय सुशोभित करणे, विकास कामे करणेसाठी र. रू. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबतमा.धनंजय जाधव व मा.अशोक येनपुरे यांचे दि. १८/११/२०१५ चे पत्र.
नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६२०/ठराव क्र.१६२०**

प्रभाग क्र. १९ ब स.नं. २५ क्रॅकोलेड सोसायटी मधील मनपा ताब्यातील गार्डनचे अर्धवट काम पूर्ण करणेसाठी र. रू. २५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, (मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.) याबाबत मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.श्रीकांत जगताप यांचे दि. १८/११/२०१५ चे पत्र.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–हे कोणत्या तरतूदीतून घेतले आहे?
नगरसचिव–यामध्ये तसा उल्लेख केलेला नाही. हे तपासावे लागेल. हे आगाखान पॅलेस, प्रभाग क्र.१७ ब.
मा.बापूराव कर्णे गुरूजी– हे 'स' यादीतील आहे.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६२१/ठराव क्र.१६२१**

प्रभाग क्र.६६ ब, मध्ये विविध ठिकाणी भूमिगत तारा ( अंडरग्राऊंड ) करणेसाठी र.रू.४० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.अविनाश बागवे यांचे दि. १८/११/२०१५ चे पत्र.
नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६२२/ठराव क्र.१६२२**

प्रभाग क्र. २६ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युतविषयक कामे करणेसाठी र.रू. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.अश्विनी जाधव व मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम यांचे दि. १६/११/२०१५ चे पत्र.
नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१६२३ /ठराव क्र.१६२३**

नदी पात्रातील प्रदुषण टाळण्यासाठी पुणे शहरातील मुळा, मुठा व पवना नदी वरील सर्व पुलांवर दोन्ही बाजुंचे कठड्यानां ७ फुट उंचीच्या भक्कम जाळ्या बसविणेसाठी र.रू. ३९ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी (मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.) याबाबत मा.बापुसाहेब कर्णेगुरुजी व मा. शिवलाल भोसले यांचे दि. १६/११/२०१५ चे पत्र.
नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र– १६२४/ठराव क्र.१६२४**

केशवनगर भागात पुणे मनपाच्या जागेत कुंभारवाडा, कुत्री, म्हशींचे गोठे यांचे पुनर्वसन केले आहे तेथे रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करणेसाठी र.रू. ११ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी. ( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.) याबाबत मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.शिवलाल भोसले यांचे दि. १६/११/२०१५ चे पत्र.
नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र– १६२५/ठराव क्र.१६२५**

सिंहगड किल्ल्यावर नरवीर तानाजी मालुसरे समाधी स्थळाच्या ठिकाणी पुणे महानगरपालिके च्या वतीने स्वराज्य निष्ठा शिल्पाचे उर्वरित काम पूर्ण करणेकरिता र.रु.२ कोटी ५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता, मा.श्रीकांत जगताप व मा.दिलिप बराटे यांचे दि. १८/११/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र– १६२६/ठराव क्र.१६२६**

मा.स्थायी समिती ठराव क्र. ९८८ दि. १/९/२०१५ चा फेरविचार करण्यात यावा याबाबत मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १९/११/२०१५ चे पत्र.

व्हिजन नेक्सट मॅनेजमेंट सोल्युशन्स प्रा. लि. कोथरूड पुणे ३८ यांना पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडील आर्किटेक्ट ऐवजी रस्ते आणि पुलांच्या कन्स्ल्टंट पॅनेलवर त्यांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र– १६२७/ठराव क्र.१६२७**

मा.सौ.नंदा लोणकर व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि.१९/११/२०१५ चे फेरविचाराचे पत्र

मा.स्थायी समिती ठराव क्र. १३७९ दि. १९/१०/२०१५ चा फेरविचार करण्यात यावा.(पुणे महानगरपालिका हद्दीतील विना परवाना बांधकाम व विना भोगवटापत्र वापराचे बांधकामाचे संदर्भात तडजोड फी आकारुन नियमित करण्याबाबत एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १४३ नुसार नियमान्वित करणेबाबत)

मा.सौ.मुक्ता टिळक–विषय काय होता? याची माहिती द्यावी.

नगरसचिव–पुणे महानगरपालिका हद्दीतील, विना परवाना, भोगवटापत्र याबाबत अभिप्राय आला होता आणि १४३ नुसार कार्यवाही करणेबाबतचा आहे.

मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र– १६२८ /ठराव क्र.१६२८**

पुणे महानगरपालिका स्थायी–उपसमिती (ऑडिट–उपसमिती)ची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यातील बुधवारी बोलविण्यास मान्यता देण्यात यावी, याबाबत मा.सौ.नंदा लोणकर व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १९/११/१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

## <u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>

विषय क्र.१५६३/ठराव क्र.१५६३

मा.बापूराव कर्णे गुरूजी–या विषयाबाबत माहिती द्यावी.

मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–मा.अध्यक्षा, महोदया, आंबेडकर शाळा येथील जी प्लसची इमारत आहे त्यांचे कन्सल्टंटकडून सर्वेक्षण केले आहे आणि ती धोकादायक असल्याचा रिपोर्ट दिलेला आहे. तसेच त्यातील टॉयलेट ब्लॉक अत्यंत धोकादायक झाले असल्यामुळे आणि शिक्षणमंडळाच्या माध्यमातून आपल्याकडे स्वच्छतागृहाकरिता आणि टॉयलेट ब्लॉककरिता जी तरतूद उपलब्ध झाली होती. त्या तरतूदीतून आपण या टॉयलेट ब्लॉक्सचे ४६ लाख रू.इस्टीमेंट तयार केले आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे सी.एस.आर.मधून करून घेता येईल.

मा.सुभाष जगताप–ही इमारत पाडावयास सांगितली आहे.

मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–जी इमारत पाडणार आहेत ते सोडून बाहेरच्या बाजूला ग्राउंडच्या कडेला बांधणार आहोत. कारण स्वच्छतागृह अत्यंत धोकादायक झालेले आहे.

मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते –शाळा पाडणार आहेत. तेथे विद्यार्थी बसणार नाहीत.

मा.खांडवे,अधी.अभि.(भवन)–मा.अध्यक्षा महोदया, शाळा पाडणार आहोत म्हणजे आर.सी.जी. कन्सल्टंट यांच्या अहवालाप्रमाणे जो ग्राउंड फ्लोअर आहे तो रिटेन्ड करणार आहोत आणि वरचे तीन मजले, त्याचे वजन कमी करणार आहोत, असा तो प्रस्ताव आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

मा.अध्यक्षा–डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळा पाडणार असतील तर कसे काय? आणि स्वच्छतागृहाचे काम सी.एस.आर.मधून होऊ शकते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय एक महिना पुढे घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार १ महिन्यानंतर करावा.

विषय क्र.१५६४/ठराव क्र.१५६४

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१५६५/ठराव क्र.१५६५

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१५६६/ठराव क्र.१५६६
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१५६७/ठराव क्र.१५६७
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१५६८/ठराव क्र.१५६८
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१५६९/ठराव क्र.१५६९
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५७०/ठराव क्र.१५७०
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५७१/ठराव क्र.१५७१
मा.सौ.मुक्ता टिळक–या विषयाबद्दल माहिती द्यावी.
मा.विजय दहीभाते,उपायुक्त(विद्युत)– मा.चेअरमन महोदया, मुख्य इमारतीवर आऊटडोअर टाईप आर्किटेक्चर, प्रकाश व्यवस्था करण्याचे हे काम आहे. यामध्ये जवळजवळ ११० एल.ई.डी.फिटींग्ज असून त्याप्रमाणे सुशोभिकरण करणार आहोत. हे परमनंट स्वरूपाचे आहे.यामध्ये आय.पी.६६ अप ॲण्ड डाऊन मोनोलाईटसच्या फिटीग्ज बसवित आहोत. त्यानंतर आर.जी.बी.वॉल वॉशर्स बसविणे आणि डी.एम.एस.कंट्रोल युनिट बसविणार आहोत.त्यामधून आपल्याला वेगवेगळे इफेक्टस करता येतील. विशेषत: दि.२६ जानेवारी आणि दि.१५ ऑगस्ट त्यावेळेस आपण आपल्या भारत देशाचा तिरंगा ध्वज त्यावर डिझाईन करू शकतो, अशा पध्दतीने आपण हे काम करणार आहोत. यामुळे सुशोभिकरण होणार असून, त्यासाठी हा प्रस्ताव समितीपुढे ठेवला आहे.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१५७२/ठराव क्र.१५७२
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
मा.राजेंद्र शिळीमकर–हे अबॉव्हू का आले आहे? आपले रेट कमी आहेत का?
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते –मा.मुख्यसभेने मान्यता दिली आहे की, आपल्याला बिलोने काम करता येणार नाही. कारण आपण जेव्हा ही कामे कॉन्ट्रक्टवर देतो आणि यामध्ये खाजगी कामगार, अकुशल कामगार यांना पेमेंट द्यायचे असते. ते काम बिलोने करताच येणार नाही कारण सरकारनेच किमान वेतन कायदा लागू केला आहे. त्यामुळे हे बिलो रेटने करायचे नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये जे जे कर आहेत आणि कॉन्ट्रक्टरचा १० टक्के फायदा गृहीत धरून इस्टीमेंट तयार केले पाहिजे. हे त्याप्रमाणेच करावे त्यामुळे बिलो आणि अबॉव्हू जाण्याचा विषय येणार नाही.
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–टेंडर काढताना, स्पेसिफिकेशन्स स्पष्ट असली पाहिजेत. यामध्ये असे होते की, किती पाहिजेत तर ४००० आणि ४००० भागिले कामगार. हे चुकीचे आहे. यामध्ये एवढे कामगार आहेत आणि दररोज एवढे काम करायचे आहे. ही स्पष्टता असली पाहिजे.
मा.राजेंद्र शिळीमकर–आवश्यकतेनुसार करतात.
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–नाही, त्यामुळे कळत नाही आणि ते बी.आर.टी.सारखे होते.
मा.केसरी,उप आयुक्त(प.वि.क्र.१)–मा.चेअरमन, यामध्ये मा.महा.आयुक्त यांनी एक बैठक आयोजित केली होती आणि त्यामध्ये प्रत्येक वॉर्डमध्ये पडीक हद्दी किती आहेत? आणि किती सेवक नेमले पाहिजेत? याबाबत एक आराखडा तयार करून दिला आहे आणि त्या आराखड्यानुसार ही टेंडर्स काढली जातात.
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–मग टेंडर काढताना लिहावे की, एवढे सेवक पाहिजेत.
मा.केसरी,उप आयुक्त(प.वि.क्र.१)–ते नमूद असते.
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–तसे काही नसते.
मा.केसरी,उप आयुक्त(प.वि.क्र.१)–टोटल सेवक किती आणि प्रत्येक वॉर्डमध्ये किती सेवक..
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–नाही तसे नसते तुम्ही पगार काढता आणि त्याप्रमाणे सेवक असे करता.
मा.केसरी,उप आयुक्त(प.वि.क्र.१)–आता मा.सभासद यांनी अबॉव्हू बाबत विचारणा केली आहे, आपण जे टेंडर काढतो ते ठेकेदाराचा फायदा आणि हे गृहीत धरून काढतो त्याचबरोबर आपण त्यांना ड्रेस, आयकार्ड हे कंम्पलसरी करतो आणि आपला जो टेंडर रेट आहे तो १० पर्सेन्ट फायदा धरून आहे. ॲप्रन इतर कन्डीशन्समुळे अबॉव्हू झाले आहे. प्रत्येक वॉर्ड ऑफिसला अबॉव्हू आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे झाडणकामाचे आहे ते मान्य करा, यामध्ये काही अडचणी येऊ नयेत. हा विषय मान्य करा.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–हे ॲटपर तरी आले पाहिजे.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्याचे पगार फिक्स आहेत, त्यांचे पी.एफ.फिक्स आहेत त्यामुळे ते ॲटपर आले पाहिजे.
मा.राजेंद्र शिळीमकर–हा विषय पुढे घ्यावा.
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–आपल्या पेमेंटमध्ये सुपरव्हिजनचे पेमेंट करीत नाहीत.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१५७३/ठराव क्र.१५७३
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५७४/ठराव क्र.१५७४
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–ज्या संस्था व्यवसायिक आहेत, त्या हे खर्च देऊ शकतात. ज्या संस्था रजिस्टर्ड आहेत. त्यांना या रेटने द्यावयाचे आहे.
मा.अविनाश बागवे–एखाद्या शाळेचे मैदान असेल आणि ते एखाद्या संस्थेला द्यायचे असेल तर महिन्याचे ५० हजार रू.चे भाडे ते कसे काय भरू शकतील?
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–त्यामुळेच यामध्ये व्यवसायिक आणि अव्यवसायिक असे केले आहे.
मा.अविनाश बागवे–सगळेच तसे नाहीत. काही संस्था प्ले ग्रुप चालवितात. हे थोडेसे प्रॅक्टीकली करू नका.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–शाळेचे ग्राउंड देऊ नयेत.
मा.अध्यक्षा–हा विषय खास सभेमध्ये घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार खास सभेत करण्यात यावा.
विषय क्र.१५७५/ठराव क्र.१५७५
मा.अविनाश बागवे–यामध्ये प्रशासनाचा अभिप्राय, अहवाल आला आहे का?
नगरसचिव–अभिप्राय आलेला आहे.
मा.अविनाश बागवे–या विषयाबाबतचा अहवाल कुठे आहे?
नगरसचिव–याबाबतचा अहवाल आता इनवर्ड केला आहे.
मा.अविनाश बागवे–आमची विनंती आहे की, हे आता आले असेल तर हा विषय एक आठवडा पुढे घ्यावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय दफ्तरी दाखल करावयाचा आहे आणि याबाबतची माहिती नंतर घ्यावी.
मा.अविनाश बागवे–जर अहवालावर चर्चा करावयाची असेल तर मग विषय दफ्तरी दाखल का करीत आहात?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय दफ्तरी दाखल करावयाचा आहे
मा.अविनाश बागवे–महापालिकेच्या आर्थिक हिताबाबत काळजी नसेल तर ठीक आहे. आम्ही या विषयावर चर्चा करतो आणि आम्ही या विषयाबाबत प्रश्न विचारतो त्याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.
मा.अध्यक्षा–नगरसचिव,विषय क्र.१५७५ दफ्तरी दाखल करावा.
नगरसचिव–मी विषय क्र.१५७५ पुकारतो आणि तो विषय दफ्तरी दाखल करण्यास..
मा.अविनाश बागवे–आम्हाला त्यावर बोलायचे आहे. आम्हाला खुलासा हवा आहे. आम्हाला चर्चा करायची आहे त्यानंतर त्यांनी त्यावर मतदान घ्यावे मग आम्हाला कोणतीही अडचण नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय दफ्तरी दाखल करणेबाबत आमचा निर्णय झालेला आहे. त्यावर मतदान घ्यावे.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.सभासदाना बोलू द्यावे.
मा.अविनाश बागवे–आम्हाला या विषयावर बोलायचे आहे. आम्हाला खुलासे हवे आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नंतर त्या विषयावर बोलायचे असेल तर बोलू द्यात.
मा.अविनाश बागवे– मा.अध्यक्षा,हा आमचा अधिकार आहे. आम्हाला खुलासा द्यावा लागेल. नाहीतर आपणास चर्चाबंदी करणेबाबतचा आदेश द्यावा लागेल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मतदानाने दफ्तरी दाखल करावा आणि त्यानंतर चर्चा करायची असेल तर करू द्यावी.
मा.अविनाश बागवे–नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–एका कोणत्या तरी विषयावर चर्चा करावी.
मा.अविनाश बागवे–विषय एकत्र करायचा असेल तरी देखील आमची तयारी आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय दफ्तरी दाखल करा आणि मग चर्चा करा. आवश्यक असल्यांस मतदान घ्यावे.
मा.अविनाश बागवे–मा.पारखीसाहेब, मला या विषयावर बोलायचे आहे. मला त्या विषयावर खुलासा हवा आहे.
मा.अध्यक्षा–विषय क्र.१५७५ वर मतदान घ्यावे.
नगरसचिव–विषय क्र.१५७५ वर मतदान घेण्यात यावेत, असे मला आदेश दिले आहेत.
मा.अविनाश बागवे–मला त्या विषयावर बोलायचे आहे.
नगरसचिव–मा.अध्यक्षांनी मला आदेश दिले आहेत आणि मला त्याचे पालन करावे लागेल.
मा.अविनाश बागवे–म्हणजे?

नगरसचिव–मी हे करू शकत नाही.
मा.अविनाश बागवे–कायदेशीर, तुम्ही असे काय करीत आहात? कायदेशीर मतदान कधी घेतात? चर्चा झाल्यानंतर, खुलासे झाल्यानंतर, मग मतदान घेतात. त्यांनी मला आदेश दिले, असे तुम्ही का करीत आहात?
नगरसचिव–आपण एक लक्षात घ्या, की मी इथे जे काम करतो. ते ऑन बिहाफ ऑफ चेअरमन, त्यांच्यावतीने त्याचा सहकारी या नात्याने मी इथे काम करीत आहे. ते मला जे आदेश देतात. ते मला इथे आणि सभागृहामध्ये पाळणे बंधनकारक आहे.
मा.अविनाश बागवे–तुमच्या सभा कामकाज नियमावलीप्रमाणे आणि त्यांच्या पध्दतीप्रमाणे, आम्हाला जर एखाद्या विषयावर बोलायचे असेल तर ते आधी की, नंतर. आम्ही आधीच बोलतो.
(सभागृहात गोंधळ सुरू झाला)
नगरसचिव–मला त्यांनी आदेश दिले आहेत.
मा.अविनाश बागवे–साहेब, तुम्ही चुकीचे पालन करीत आहात.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नगरसचिव,आपल्याला जे आदेश दिले आहेत त्याचे पालन करावे.
नगरसचिव–विषय क्र.१५७५..
मा.अविनाश बागवे–मा.पारखी साहेब, एकदम चुकीचा विषय होत आहे.  माझी प्रशासनाला सुध्दा विनंती आहे की, साहेब हे १०० टक्के.  मी याबद्दल आधी सुध्दा सांगितले आहे आणि हे ऑन रेकॉर्ड सांगत आहे.  ज्या लोकांना याचे गांर्भीय नसेल आणि आपण काही चालते.  परंतु जेव्हा न्यायालय येईल त्यावेळेस सगळे उभे राहतील.
(सभागृहात गोंधळ सुरू झाला)
मा.अध्यक्षा–नगरसचिव, आपण मतदान घ्यावे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नगरसचिव साहेब मतदान सुरू करावे.
नगरसचिव–विषय क्र.१५७५ दफ्तरी दाखल करणेस कोणाचा विरोध आहे का?
मा.अविनाश बागवे–मा.पारखी साहेब, तुम्ही एकदम चुकीचे करीत आहात. आमची विनंती आहे की, पारखी साहेब, आपण तसे करू नका.
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–जे काही होईल ते नंतर पाहू.
मा.अविनाश बागवे–रमेश कदम सुध्दा असेच म्हणाले होते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नेहमी तुम्ही आम्हाला सांगणार का? हे तुम्ही ठरविणार आहात का?
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
मा.अविनाश बागवे–तुम्ही काहीही सांगत आहात.हे असे, सारखे सारखे चालत नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–एकदा चेअरमनने सांगितल्यानंतरही तुम्ही बोलत आहात.
मा.अविनाश बागवे–आम्ही लोकांच्या बाजूने बोलत आहोत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नगरसचिव साहेब मतदान सुरू करावे.
नगरसचिव–विषय क्र.१५७५ दफ्तरी दाखल करणेस कोणाचा विरोध आहे का?
मा.अविनाश बागवे–यास आमचा विरोध आहे.
नगरसचिव–यास विरोध असल्यामुळे..
मा.सौ.मुक्ता टिळक–यावरील खुलासा द्यावा.
मा.अविनाश बागवे–तुम्ही चुकीचे करीत आहात. प्रशासनाचा खुलासा नाही, चर्चा नाही आणि हे काय करीत आहात? सभागृहामध्ये देखील प्रश्नोत्तर चालू आहेत.
मा.अध्यक्षा–नगरसचिव, मतदान सुरू ठेवावे.
नगरसचिव–विषय क्र.१५७५ दफ्तरी दाखल करणेस विरोध असल्यामुळे मी यावर मतदान घेतो.
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
मा.अविनाश बागवे–मा.सभागृहनेते आपण लक्षात ठेवा की, आपण आता आवाज दाबत आहात परंतु न्यायालयीन प्रक्रियेमध्ये तुम्हाला त्रास होणार आहे. हे तुम्ही लक्षात ठेवा.
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्हाला सुध्दा कसे लढायचे हे माहिती आहे.
मा.अविनाश बागवे–नुसते शब्दात नाही तर, कृतीत दाखवा.
मा.अध्यक्षा–सभासदांनी आपआपसात बोलू नका.
मा.अविनाश बागवे–कृतीमध्ये दाखविण्यासाठी ताकद लागते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही लढू.
मा.अध्यक्षा–मा.सभागृहनेते...
नगरसचिव–हा विषय दफ्तरी दाखल करण्यास विरोध झाल्यामुळे यावर मतदान घेतो.
मा.अविनाश बागवे–साहेब, मी तुमच्या या कृतीचा निषेध करतो.  तुम्ही सभागृहात सुध्दा चर्चा घडवून मग मतदान घेता.
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
नगरसचिव–हा विषय..

मा.सौ.मुक्ता टिळक–माझी मा.चेअरमन यांना विनंती आहे की..
नगरसचिव–हा विषय दफ्तरी दाखल करण्यास जे अनुकूल आहेत..
मा.अविनाश बागवे–पारखी साहेब, तुम्ही हे काय करीत आहात?
मा.सौ.मुक्ता टिळक–माझी विनंती आम्हाला बोलू द्या.
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
नगरसचिव–हा विषय दफ्तरी दाखल करण्यास जे अनुकूल आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–आपण हा विषय दफ्तरी दाखल करू परंतु..
मा.अविनाश बागवे–प्रशासन सुध्दा गप्प बसले आहे. कुठल्याही गोष्टीचा खुलासा नसताना, आपण गप्प बसलात. मी या समितीचा सदस्य म्हणून बोलत आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–आपण हा विषय दफ्तरी दाखल करू पण त्याचा थोडा खुलासा तरी द्यावा.
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मतदान घ्यावे आणि त्यानंतर जे काही विचारायचे आहे ते विचारावे.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्याचा खुलासा द्या.
नगरसचिव–हा विषय दफ्तरी दाखल करण्यास ज्यांचा विरोध आहे त्यांनी कृपया हात वर करावेत.
अनुकूल –९
प्रतिकूल –३
**निर्णय–**सदरचा विषय बहुमताने दफ्तरी दाखल करण्यात आला.
मा.सौ.मुक्ता टिळक–हे एकदम चुकीच्या पध्दतीने झालेले आहे. आम्ही विषयाच्या बरोबर राहिलो असतो परंतु या विषयाचा पूर्ण खुलासा झालेला नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–पाणी वाहून गेल्यावर आम्ही राहिलो असतो.
मा.अविनाश बागवे–चर्चा तर होऊ द्या. चर्चेला का घाबरत आहात? आपण सांगता एक आणि करता वेगळेच. आपल्यामध्ये धमक असेल तर समोर करावे.
मा.राजेंद्र शिळीमकर–नगरसचिव, पुढील विषय घ्यावा.
(सभागृहात गोंधळ सुरू होता.)
मा.अध्यक्षा–सभासदानी आपआपसात बोलू नये.
नगरसचिव–सुरक्षारक्षक विभागाचा जो दुसरा विषय, अभिप्राय आलेला आहे तो अजेंड्यावर घेतलेला आहे.
मा.राजेंद्र शिळीमकर–तो विषय सुध्दा घ्यावा आणि तो देखील मान्य करावा.
मा.अध्यक्षा–तो विषय सुध्दा मान्य करायचा आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–होय, तो विषय सुध्दा मान्य करावा.
विषय क्र.१५७६/ठराव क्र.१५७६
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१५७७/ठराव क्र.१५७७
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१५७८/ठराव क्र.१५७८
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५७९/ठराव क्र.१५७९
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५८०/ठराव क्र.१५८०
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५८१/ठराव क्र.१५८१
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते– आमच्या प्रभागातील तळजाई टेकडीवर मोठ्याप्रमाणात वृक्षारोपण केले आहे. मागील १० वर्षामध्ये महापालिकेने जेवढे वृक्षारोपण केले तेवढे वृक्षारोपण करून येथील झाडे जगविली आहे. यासाठी दररोज २ ते ३ टॅकर्सचे पाणी आवश्यक असते परंतु आमच्या भागात पाण्याचे टॅंकर्स येतच नाहीत.
मा.अध्यक्षा–प्रशासनाने याठिकाणी पाणीपुरवठा करणेसाठी टॅकर्सची सोय करून द्यावी.
मा.राजेंद्र शिळीमकर–आपण यामध्ये पिण्याचे पाणी वापरू नये.
मा.सुभाष जगताप,माजी सभागृहनेते–मा.अध्यक्षा, यामध्ये आपण एक उपसूचना घ्यावी की, या विषयामध्ये तीनच्या ऐवजी टॅकर्स घ्यावेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपल्याला चॅसीज घ्यायच्या आहेत, आपण तसे करू शकतो का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यातील चॅसीज घ्याव्यात किंवा नाहीत, याबाबतचा निर्णय करावयाचा आहे. कारण यामध्ये ब्रेक्सच्या बाबत गर्व्हमेंटकडून एक नवीन रूल आला आहे. त्यामुळे हा विषय पुढे घ्यावा आणि त्यावेळी जे काही असेल त्यांची माहिती घेऊन नंतर हा विषय मान्य करू.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१५८२/ठराव क्र.१५८२

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१५८३/ठराव क्र.१५८३

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१५८४/ठराव क्र.१५८४

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१५८५/ठराव क्र.१५८५

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेमध्ये घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१५८६/ठराव क्र.१५८६

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१५८७/ठराव क्र.१५८७

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेमध्ये घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१५८८/ठराव क्र.१५८८

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेमध्ये घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१५८९/ठराव क्र.१५८९

मा.अध्यक्षा–या विषयाबाबत खास सभा घ्यावी.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ही खास सभा या आठवड्यामध्ये आयोजित करावी.

मा.अविनाश बागवे–मा.सभागृहनेते यामध्ये एक विद्यार्थी वाहतूक बिलाचा विषय आहे. यामध्ये जे २ कोटी ५२ लाख रू.चे बिल आहे, आपल्याला वाटल्यास ते अमान्य करा किंवा काहीही करा. परंतु यावर्षी विद्यार्थ्यांसाठी जे आहे त्यापैकी २ कोटी रू.विद्या निकेतनच्या विद्यार्थ्यांच्या वाहतूकीसाठी आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–पुढील आठवड्यामध्ये खास सभा घेत आहोत.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार खास सभेत करावा.

विषय क्र.१५९०/ठराव क्र.१५९०

मा.बापूराव कर्णे गुरूजी–या विषयाची माहिती द्यावी.

मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त(प.मं.का.क्र २ )–मा.अध्यक्षा,या वर्षामध्ये मंडई साफसफाईसाठी ९१ लाख रू.ची तरतूद होती आणि ती तरतूद कमी पडत आहे म्हणून हा प्रस्ताव सादर केला आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–९१ लाख अधिक आहेत का?

मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त(प.मं.का.क्र २)–मा.अध्यक्षा, ५१ प्लस आणि हे असे आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–परंतु मंडई स्वच्छ रहात नाही.

मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त(प.मं.का.क्र २ )–मा.अध्यक्षा, मागील चार महिन्यांपासूनचे ठेकेदाराचे पेमेंट करावयाचे आहे आणि आता फक्त ८ ते १० हजार रू.शिल्लक आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा प्रॉब्लेम प्रत्येक ठिकाणी आहे. आपण आऊटसोर्सिंगने कामे ठेकेदाराला देतो आणि ज्याक्षणी आपल्याकडील तरतूद संपते त्याआधी हे काम करत नाही. यामुळे कचरा साठायला सुरूवात होते आणि तो दररोज वाढतच जातो.

मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त(प.मं.का.क्र २ )–मा.अध्यक्षा, आपण काम चालूच ठेवले आहे, काम थांबविलेले नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–अशावेळी मग एखाद्या ठिकाणी ५ कामगार आवश्यक असतील तर, ठेकेदार तिथे तीनच कामगार देतात आणि मग त्या कामगारांची सुध्दा एक क्षमता आहे, ती किती काम करणार?

मा.अध्यक्षा–घनकचरा विभागासाठी प्रभागनिहाय तरतूद असताना हे वर्गीकरण का आणले आहे?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी भरपूर तरतूद उपलब्ध करून दिली परंतु ती प्रॉपर कामासाठी वापरली जात नाही.

मा.अध्यक्षा–मंडई सारखा विषय नवीन नाही असे असताना प्रशासनाला वर्गीकरण घेण्याची वेळ यावी ही गोष्ट विशेष वाटत नाही का? मा.आयुक्त साहेबांचे बजेट तयार होत असतानाच या तरतूदीचा अंदाज घेऊन, ती तरतूद त्याचवेळेस करावयास हवी होती. मंडई स्वच्छ करण्याचे काम पहिल्यांदाच होत नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–मंडईच्या हेड अंतर्गत किती निधी उपलब्ध आहे? याबाबतची माहिती पुढील सभेत द्यावी. कारण यामध्ये तीन वर्गीकरणे आहेत.
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेमध्ये घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५९१/ठराव क्र.१५९१
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेमध्ये घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५९२/ठराव क्र.१५९२
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेमध्ये घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१५९३/ठराव क्र.१५९३
मा.राहूल तुपेरे–या विषयाबद्दल माहिती द्यावी.
नगरसचिव–माहे मार्च मध्ये हा महोत्सव घेतला होता आणि त्यावेळी गर्दी झाली नव्हती असे आक्षेप होते. काही तक्रारी आल्या होत्या. या तक्रारीनुसार, मा.अति.महा.आयुक्त यांनी याकामी ६ अधिकाऱ्यांची समिती नेमली होती. त्यामध्ये मी स्वत: होतो आणि मा.मोळक साहेब, मा.रवी पवार,महा.सहा.आयुक्त, मा.शाम ढवळे, कार्य.अभि.(हरिजेट) आणि त्यांनी ३ दिवसांमध्ये अहवाल द्यावा, असे सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात त्यामध्ये मी, मा.ज्ञानेश्वर मोळक साहेब आणि मा.कुमावत असे तिघेजण उपस्थित होतो आणि इतर ३ अधिकारी काही कारणांमुळे अनुपस्थित होते. यामध्ये मुख्य आक्षेप असा होता की, जाहिरात केली गेली नाही. ही जबाबदारी मा.महापौर कार्यालय यांची होती. ती जबाबदारी ठेकेदाराची नव्हती. याबाबत मा.महापौर कार्यालयाकडून जाहिराती देण्यात आलेल्या होत्या त्याही व्यतिरिक्त म्हणजे महापौर कार्यालयाच्यावतीने दि.१० मार्च रोजीच्या दै.केसरी आणि दै.प्रभात मध्ये कार्यक्रमांची जाहिरात देण्यात आली होती आणि दि.१२ मार्च, दि.१३ मार्च आणि दि.१५ मार्च रोजी दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये ठेकेदाराच्यावतीने जाहिरात देण्यात आली होती.
मा.राहूल तुपेरे–ही जाहिरात कोणत्या साईजची होती? याबद्दल माहिती द्यावी.
मा.राजेंद्र शिळीमकर–जाहिरातीचे जाऊ द्या, कार्यक्रम दर्जेदार नसेल तर बघायला कोण येणार?
नगरसचिव–ही माहिती पुढील सभेत देतो.
मा.राहूल तुपेरे–मा.अध्यक्षा, हा विषय पुढील सभेत घ्यावा. या बाबत मी तक्रार केली होती आणि यामध्ये मला कोणतीही विचारणा करण्यात आली नाही. मा.अध्यक्षा, या कार्यक्रमामध्ये जे कलाकार सहभागी होणार होते त्यांची नावे फक्त पेपरवर आणि जाहिरातीमध्येच होती आणि कार्यक्रमात मात्र पुण्यातील कलाकार होते. तेथे झोपडपट्टीमधील कलाकार होते. या कार्यक्रमासाठी मा.आनंद शिंदे, मा.मिलिंद शिंदे यांच्या टीमची नावे दिली होती परंतु त्यांची एकही टीम तेथे नव्हती. यामध्ये सगळे कलाकार दांडेकर पूल चौकातील होते. हे कार्यकर्ते कलाकार कुठल्यातरी सामान्य गायनपार्टीमध्ये गाणारे कलाकार होते आणि आपण मा.आनंद शिंदे, मा.मिलिंद शिंदे यांच्या नावावर रक्कम मोजत असू आणि त्याठिकाणी चौकामध्ये वाजविणारे आणि दारू पिणारे कलाकार कार्यक्रम करणार असतील तर आपण त्याचे पैसे द्यायचे का?
मा.अविनाश बागवे–मा.सभासदानी तक्रार केली होती आणि त्यानुसार सर्व करावयास हवे होते.
नगरसचिव–होय, मा.सभासदानी पत्र दिले होते आणि याबाबत मा.स्थायी समितीमध्ये ठराव सुध्दा दिला होता आणि त्यानुसार केले आहे.
मा.अविनाश बागवे–हे झाले परंतु जेव्हा चौकशी समिती होती त्यावेळी विचारणा करावयास हवी होती की, मा.सभासद यांचा नक्की आक्षेप काय आहे?
नगरसचिव–ते त्यांनी ठरावामध्ये दिले होते की, त्यानुसार चौकशी करावी आणि त्याशिवाय देऊ नये आणि त्याप्रमाणे आपण त्यांचे ३० टक्के पेमेंट थांबविले होते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–झोपडपट्टीमध्ये कलाकार नसतात का?
मा.राहूल तुपेरे–मा.सभागृह नेते, माझा मुद्दा लक्षात घ्यावा. मला माहिती आहे की, झोपडपट्टीमध्ये कलाकार असतात.
मा.राजेंद्र शिळीमकर–मा.सभासद यांचे म्हणणे असे आहे की, कार्यक्रम दर्जेदार नव्हता.
मा.राहूल तुपेरे–या कार्यक्रमाची जाहिरात दिलेली नव्हती आणि या कार्यक्रमाला फक्त २० ते ३० प्रेक्षक उपस्थित होते.
मा.राजेंद्र शिळीमकर–मा.सभासद यांच्या तक्रारी मध्ये तथ्य आहे आणि त्यावेळी त्या सांस्कृतिक महोत्सवाचा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करणारे कार्यक्रम घेण्यात आले.
मा.राहूल तुपेरे–होय, १०० टक्के असेच झाले आहे.
मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, त्या कार्यक्रमाला हजारो लोक येतात. मा.कुमावत साहेब, त्यावेळी तेथे कोणत्या दर्जाचा कार्यक्रम झाला होता? याबद्दल माहिती द्यावी. आपण जर या कार्यक्रमासाठी लाखो रू.देणार असू तर त्या दर्जाचा कार्यक्रम झाला पाहिजे. अशा बाबतीत आपण त्यामध्ये असे स्पष्ट नमूद करतो की, आम्हाला अमूक ह्या कलाकाराचा कार्यक्रम पाहिजे आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामधील ७० टक्के बिल दिले आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–चौकशी समितीने अभिप्राय काय दिला होता? याबाबत माहिती द्यावी.
नगरसचिव–यामध्ये ७० टक्के बिल अदा केले आहे आणि मा.स्थायी समितीच्या ठरावानुसार ३० टक्के बिल रोखून ठेवले आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये किती खर्च झाला होता? याबाबत माहिती द्यावी.
नगरसचिव–यामध्ये एकूण १७ लाख रू.इतका खर्च झाला होता.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–अशाबाबत पुढील वेळेस तक्रारी येऊ नयेत.
नगरसचिव–आपण जाहिरात दिली होती.
मा.राहूल तुपेरे–यामध्ये जाहिरात अजिबात दिलेली नाही.
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदरचा विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

अशा पध्दतीने सभा समाप्त झाली.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**